# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक ०८/०६/२०२२ (बुधवार)**

**(दुपार)**

---

### पोलिस स्टेशन कोंढाळी पोलीसांची अवैध धंदयावर धडक कारवाई

मा.पोलीस अधिक्षक श्री विजयकुमार मगर, नागपुर ग्रामीण यांचे मार्गदर्शनाखाली दि. २५/५/२०२२ ते दि. १५/६/२०२२ या कालावधीत दारुबंदी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्यानुसार दि. ०७/०६/२०२२ रोजी पोलीस स्टेशन कोंढाळी येथे विशेष पथक तयार करुन पो.स्टे हददीतील मौजा चंदनपारडी या गावामध्ये अवैध दारुविक्री बाबत मोहीम राबवित असतांना आरोपी नामे अनोज शंकरराव पाटील वय ३६ वर्षे रा. चंदनपारडी हा त्याची कार क्र. एम.एच– ३२/वाय– ३१७९ या वाहनामध्ये अवैध्यरित्या देशी दारु बाळगुन विक्री करीत असल्याची माहिती प्राप्त झाली. त्यानुसार पो.स्टे. कोंढाळी चा स्टाफ यांनी सदर आरोपीचे राहते घरा समोर गेले असता, नमुद कार उभी दिसली व गाडी मध्ये आरोपी हजर मिळुन आला. सदर कारची झडती घेतली असता डिक्कीमध्ये एका प्लॅस्टिक चुंगळीमध्ये देशी दारु च्या एकुण १०९ निपा प्रत्येकी १८० एम.एल.च्या कि. ७,६३०/–रु. च्या मिळुन आल्या. तसेच अल्टो कार क्र. एम.एच– ३२/वाय– ३१७९ किं. १,१०,०००/– रुपये असा एकुण कि. १,१७,६३०/– रुपयाचे मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर आरोपी अवैधरित्या विनापरवाना दारू बाळगुन मिळुन आल्याने सदर आरोपीविरूद्ध पो.स्टे. कोंढाळी येथे सर तर्फे पोशि नितेश डोकीमारे यांची तक्रार घेवुन अप क्र. २३६/२२ कलम ६५(ई) महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला.

सदरची कारवाई मा. पोलीस अधिक्षक श्री विजयकुमार मगर, नागपुर जिल्हा (ग्रामीण), नागपुर, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री राहुल माकणीकर, नागपुर जिल्हा (ग्रामीण), नागपुर, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, काटोल विभाग, काटोल श्री नागेश जाधव यांचे मार्गदर्शनाखाली कोंढाळी पोलीस स्टेशनचे सपोनि श्री अजित कदम, पोउपनि ढगे, नापोशि नितीन लवटावार, पोशि प्रशांत काळे, पोशि नितेश डोकीमारे यांनी केली आहे.



पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर